# कृषिमंत्री धनंजय मुंडेंचा घोषणांचा पाऊस; शेतकऱ्याच्या हातात भोपळा

## नुकसान १०० टक्के भरपाई मात्र २५ टक्के

## जिल्ह्यात सर्वात जास्त शेतकरी आत्महत्या

कृषिमंत्री धनंजय मुंडेंना शेतकऱ्यांची जाण नाही; दहा वर्षात अंबाजोगाईत कारखाना उभा करता आला नाही; आपेट, देशमुख, गुट्टे यांचा गंभीर आरोप

# शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी तहसीलवर धडकला बैलगाडी मोर्चा




सायं.दैनिक बीड ■ E-mail : beedsarkar @ Gmail.com ■ किंमत: १ रू. ■ पाने : ४

# सरकार

संपादक-आदोडे साहस

Evening Daily beedsarkar




बीड (सरकार): बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा २०१८-२०१९ या वर्षातील पिक विमा अद्याप मिळाला नाही तसेच सोयाबीनला हमीभाव नाही यासह शेतकऱ्यांच्या इतर प्रश्नावर शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने परळी उपविभागीय कार्यालयावर सोमवारी (ता.२३) सकाळी १०.०० वा.भव्य बैलगाडी व ट्रॅक्टर मोर्चास सुरुवात झाली. या मोर्चात शेतकरी, शेतमजूरांनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. अशी माहिती शेतकरी संघर्ष समिती यांनी दिली आहे.

बीड जिल्ह्याला २०१८ पासून चा पिक विमा मिळालेला नाही. बीड जिल्ह्याच्या शेजारी असणारे परभणी, धाराशिव, लातूर आदी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पिक विमा मिळालेला आहे. परंतु महाराष्ट्राचे कृषिमंत्री असलेल्या नामदार धनंजय मुंडे यांच्या बीड जिल्ह्यातील शेतकर्यांचा सन २०१८-२०१९ व २०१९-२०२० चा पिक विमा तसेच सोयाबीन खरीप पिक विमा, गुलाबी बोंड आळी नुकसान भरपाई आदीपासून वंचित आहे. केवळ वेगवेगळ्या अनुदानाच्या घोषणा केल्या जातात मात्र शेतकऱ्यांच्या हातात भोपळा दिला जात आहे.सरकारच्या उदासीन भूमिकेमुळे बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना अद्याप पीक विमा मिळाला नसल्याचे म्हटले आहे. बीड जिल्ह्यात महाराष्ट्रातील सर्वाधिक शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. दरम्यान, कालिदास आपेट यांनी दहा वर्षात पालकमंत्र्यांना अंबाजोगाई शेतकऱ्यांसाठी कारखाना उभा करता आला नाही. एवढेच नव्हे तर महाराष्ट्रात सर्वात जास्त बीड जिल्ह्यात शेतकऱ्यांनी आपले जीवन संपविले आहे. त्यामुळे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांना शेतकऱ्यांची जाण नाही असा आरोप या मोर्चा दरम्यान केला आहे.

पीक विमा, हमीभाव, कर्जमुक्ती, यासह इतर मागण्याला घेत सोमवारी (ता.२३) आयोजित करण्यात आलेल्या भव्य अशा ट्रॅक्टर, बैलगाडी शेतकरी हक्क मोर्चात शेतकरी, शेतमजूर यासह नागरीक व शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने राजेसाहेब देशमुख, राजेश देशमुख, जिल्हाध्यक्ष कॉ.ॲड.अजय बुरांडे, कालिदास आपेट उत्तमराव माने, किरणकाका पवार, सुदामती गुट्टे, अच्युत गंगणे, ॲड.माधव जाधव,मच्छिंद्र जगताप ,राजेभाऊ फड, प्रभाकर वाघमोडे कॉ. भगवान बडे, गंगाधर पोटभरे, ॲड.जीवनराव देशमुख कैलास सोळंके,बाबासाहेब काळे आदी उपस्थितीत होते.


बीड महाराष्ट्र ■ वर्ष १२ वे ■ अंक २८ ■ सोमवार २३ सप्टेंबर २०२४ ■ RNI NO. MAHMAR/2012/49908 पोस्टल दिनांक २४ सप्टेंबर २०२४ पाने ४ किंमत १ रू.

Beed MAHARASHTRA ■ Year 12 Issu 28 ■ Monday 23 September 2024 ■ RNI NO. MAHMAR/2012/49908 ■ पोस्टल क्रं.No.L/SB/Beed/RNP-169/2022-2024


# हैदराबाद गॅझेट, सगेसोयरे अधिसूचनेवर निर्णय होणार?

मुंबई (सरकार): हैदराबाद गॅझेट लागू करणे आणि सगेसोयरे अधिसूचनेवर अंतिम निर्णय घेण्याबाबत कार्यवाही करण्याच्या सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या असून त्यावर सोमवारी मराठा आरक्षण विषयक मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत निर्णय घेतला जाणार असल्याची माहिती राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई यांनी दिली.

दुसर्याला द्यायची सरकारची भूमिका नाही. ओबीसी आरक्षणाला कोणताही धक्का लावला जाणार नाही. त्यामुळे ओबीसी समाजाने संभ्रम बाळगू नये, असेही देसाई यांनी सांगितले. मनोज जरांगे यांचे उपोषण सोडवण्यासाठी राज्य सरकारने प्रयत्न करावेत यासाठी पुण्यातील सकल मराठा समाजाच्या शिष्टमंडळाने रविवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. यावेळी मराठा आरक्षणाबाबत राज्य सरकारने ठोस




निर्णय घ्यावा, त्यासाठी हैदराबाद संस्थान, सातारा संस्थान आणि बॉम्बे गॅझेट लागू करावे, सगेसोयरे अधिसूचना अंतिम करावी, मराठा आंदोलकांवरील गुन्हे मागे घ्यावेत या मुद्द्यावर चर्चा झाली. या मुद्द्यावर सोमवारी मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक घेऊन निर्णय घेण्याच्या सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या.

मराठा समाजाचे जे प्रलंबित प्रश्न आहेत, त्याबाबत राज्य सरकार सकारात्मक आहे. हे प्रश्न सोडविण्यासाठी नियमित पाठपुरावा करावा तसेच आपल्या वतीने जरांगेंना आंदोलन स्थगित करण्याची विनंती करावी, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी सकल मराठा समाजाचा समन्वयकांना केल्याचे देसाई म्हणाले. सोमवारी सकल मराठा समाजाचे शिष्टमंडळ तसेच मराठा आरक्षण समितीचे अध्यक्ष मंत्री चंद्रकांत पाटील, शंभूराज देसाई यांची बैठक होणार आहे. या बैठकीत जरांगेंनी उपोषण मागे घेण्यासंदर्भात सरकारकडून प्रयत्न केले जातील.

# आमदार अपात्रता प्रकरण; अखेर सुनावणीची तारीख ठरली

नवी दिल्ली (वृत्तसंस्था): शिवसेनेसह राष्ट्रवादी काँग्रेस आमदार अपात्रता प्रकरणाची सुनावणी २४ सप्टेंबरला सर्वोच्च न्यायालयात होण्याची शक्यता आहे. मागील दोन आठवड्यांमध्ये पाच दिवस हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयाच्या पटलावर होते. मात्र, अन्य प्रकरणांमुळे आमदार अपात्रता प्रकरण सुनावणीपर्यंत पोहोचू शकले नव्हते. त्यामुळे यावेळी तरी या प्रकरणावर सुनावणी होणार का, याकडे सर्वांचे लक्ष असणार आहे.

राष्ट्रवादीसह शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणात या दोन्ही आमदार अपात्रता प्रकरणांची सुनावणी एकाच वेळी घ्यायची, असे सर्वोच्च न्यायालयाने ठरवले होते. त्यानुसार गेले काही दिवस दोन्ही पक्षांच्या आमदार अपात्रता प्रकरणाच्या तारखा एकत्र पडत आहेत. मात्र यावर सुनावणी होऊ शकलेली नाही. दरम्यान,




या प्रकरणाला आधी ऑक्टोबर महिन्यातील तारीख देण्यात आली होती. मात्र एका आठवड्यानंतर पुन्हा सप्टेंबर महिन्यामध्येच तारीख देण्यात आली होती. सप्टेंबर महिन्यात दुसऱ्या आणि तिसऱ्या आठवड्यात पाच दिवस हे प्रकरण न्यायालयाच्या पटलावर होते. शिवसेना ठाकरे गटाला किंवा राष्ट्रवादी शरद पवार गटाला या प्रकरणावर लवकर सुनावणी हवी असल्यास असल्यास हे प्रकरण का महत्त्वाचे आहे याचे कारण देत न्यायालयासमोर हे प्रकरण नमूद करावे लागेल, मात्र त्यादृष्टीने शिवसेना ठाकरे गट किंवा राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून पावले उचलण्यात आले नाहीत. पुढच्या काही काळात महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक होत आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीपूर्वी आमदार अपात्रता प्रकरणाचा निकाल लागणार का, याबद्दल आता राजकीय वर्तुळात विविध तर्क वितर्क सुरू झाले आहेत.

# धनगर आरक्षणासाठी परळीत रास्ता रोको; वाहनांच्या लागल्या रांगा

परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :- पंढरपूर , लातूर , नेवासा या ठिकाणी उपोषणाला बसलेल्या धनगर जमातीच्या उपोषणकर्त्यांना पाठिंबा म्हणून धनगर आरक्षण अंमलबजावणी एसटी प्रमाणपत्र मिळण्यासाठी आरक्षणाच्या हक्कासाठी धनगर जमातीच्या वतीने परळी-वैद्यनाथ येथील ईटके कॉर्नर येथे तासभर रास्ता रोको आंदोलन केले. सरकारचा जाहीर निषेध नोंदवत घोषणा दिल्या. परळी-वैद्यनाथ येथील ईटके कॉर्नर आंदोलकांनी बीड -परभणी-नांदेड महामार्ग रोखून धरला. या रास्ता रोकोमुळे मोठी वाहतूक कोंडी होऊन वाहनांच्या रांगा लागल्या. यामुळे काही काळ वाहतुक खोळंबली होती. धनगर आरक्षण प्रश्नी सरकारने तत्परता न दाखवल्यास उग्र आंदोलन करण्याचा इशारा धनगर समाजचे युवा नेते शिवदास बिडगर व आदोलकांनी दिला आहे.

आदिवासी समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता धनगर जमातीला एसटी या प्रवर्गातून आरक्षण द्यावे. या प्रमुख मागणीसह पंढरपूर, लातूर व नेवासा येथे सुरू असलेल्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी संपूर्ण राज्यभर धनगर समाजाचे नेते आ. गोपीचंद पडळकर यांच्या आव्हानाला पाठिबा देत रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. तसेच या सरकारने तात्काळ मागणीचे परिपत्रक काढावे या मागणीसाठी



अंदोलकांनी जोर धरला. समाजाचा अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गाची अंमलबजावणी करून त्यांना आरक्षण देण्याची मागणी करत रस्त्यावर बसून आंदोलन केले . आम्ही राज्य सरकारकडे नवीन काहीही मागत नाही. आम्हाला फक्त आमचा हक्क हवा आहे जो भारतीय संविधानाने दिलेला आहे आणि तो म्हणजे एसटी प्रवर्गातून आरक्षण,आम्ही सरकारला विनंती करतो की आमच्या संयमाची परीक्षा घेऊ नका. उशीर झाल्यास आम्हाला आंदोलन अधिक तीव्र करावे लागेल आणि परिणामास सरकार जबाबदार असेल. वर्दळीच्या रस्त्यावर सुमारे एक तास हे आंदोलन चालल्याने परळी-वैद्यनाथ येथील ईटके कॉर्नर येथे दोन्ही बाजूंची वाहतूक कोंडी झाली होती. तहसीलदार यांना समाज बांधवांनी आपल्या मागण्यांचे निवेदन दिले. यावेळी धनगर समाजाचे युवा नेते शिवदास बिडगर, विकास बिडगर, दिलीप बिडगर, माऊली गडदे, भिवा बिडगर, विश्वनाथ देवकते, चंद्रकांत देवकते, भिमराव सातपुते, कमलाकर बिडगर, माऊली धायगुडे, मुंजा फुके, प्रविण बिडगर, लक्ष्मण कावळे, कपिल गाडेकर, नवनाथ दाणे, दादाराव गडदे, महादेव हाके, शाम सरवदे, गणेश देवकते, गोविंद यमगर, अंगद देवकते, रामभाऊ कोपणर, महादेव गडदे, चंद्रकत बिडगर, गोपाळ बिडगर, शिवाजी कुकर, सुग्रीव बिडगर, शाम सरवदे, परमेश्वर वैद्य, श्रीहरी कामाळे, हनुमंत कामाळे, व्यंकटेश हरणावळ व सकल धनगर समाज परळी-वैद्यनाथ जिल्हा बीड यांनी केले आहे. तसेच बंजारा समाजाचे युवा नेते बाळासाहेब (पपू ) चव्हाण व माळी समाजाचे नेते विलास आढाव यांनी आरक्षनास पाठींबा दिला.

# शब्बीर अन्सारी यांच्या संघर्षामुळे समाजाला फायदा-माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

बीड (सरकार): समाजातील वंचित आणि गोरगरिबांना आरक्षणाचा फायदा व्हावा या उदात्त हेतूने सामाजिक कार्यकर्ते शब्बीर अन्सारी यांनी ४५ वर्ष संघर्ष केला. त्यांच्या संघर्षाचा फायदा आज समाजाला मिळतो आहे. त्यांच्या कार्याची माहिती समाजाला व्हावी यासाठी या पुस्तकाचा मोठा उपयोग होणार असल्याचे माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी म्हटले आहे.

बीड येथील रविराज मंगल कार्यालयात ऑल इंडिया मुस्लिम ओबीसी ऑर्गनायझेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष शब्बीर अन्सारी यांच्या प्रेरणादायी प्रवासावर आधारित



मंडलनामा या पुस्तकाचे वाटप माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मौलाना इकबाल, शब्बीर अन्सारी, शेख जहांगीर, हाजी नसीम इनामदार, सलाम शेख, हाकीम मनियार, नगरसेवक मुखीद लाला, विलास विधाते, जमीलभाई, ॲड. अविनाश काळे, पत्रकार राजेंद्र होळकर, शेख सलाम, अब्दुल काझी, इरफान कुरेशी, खुर्शीद आलम, शेख जाकेर, जमील बागवान, शेख रहेमान आदींची उपस्थिती होती.

# भरदिवसा विद्यार्थ्याच्या अपहरणाचा प्रयत्न?

केज (सरकार): शहरातील मुख्य रस्त्यावर सोनार गल्लीत चार चाकी मधून आलेल्या तिघांनी शाळेत चाललेल्या विद्यार्थ्याचे अपहरण करण्याचा प्रयत्न केला. परंतु काही तरुणांनी हा प्रयत्न हाणून पाडला. अपहरण करणारा एक जण हाती लागला असून दोघे पळून जाण्यात यशस्वी झाले. या थरारक घटनेने शहरात खळबळ उडाली असून बालके चोरणारी टोळी पडल्याची शहरात चर्चा सुरू झाली. मात्र गैरसमजतीतून हा प्रकार घडला असल्याचे पोलिसांनी सांगितले.




पकडलेल्या त्या व्यक्तीला पोलिसांच्या ताब्यात दिले असून नेमका हा प्रकार काय? हे तपासातून समोर येईल. मेन रोडने सकाळी १० च्या सुमारास एक विद्यार्थी सोनार गल्लीतून शाळेला जात होता. त्यावेळी अचानक एक चारचाकी वाहन आले. ते वाहन मुलाजवळ येऊन थांबले.काही समजण्याच्या आत त्या विद्यार्थ्याला उचलून वाहनात टाकण्याचा प्रयत्न केला असता घडलेल्या या अनुचित प्रकार विद्यार्थी घाबरुन ओरडू लागला तर हे पाहून बाजुला उभी असलेल्या महिलेनेही आरडाओरडा केली. हे ऐकून काही नागरिकांनी धाव घेतली तर दोघांनी दुचाकी चारचाकीच्या समोर लावली असता त्यांना पळता आले नाही. परंतु झटापटीत दोघे पळून जाण्यात यशस्वी झाले तर एकजण जमावाच्या हाती लागला. त्यास जमावाने चांगलाच चोप दिला. भरदिवसा रहदारीच्या ठिकाणी ही घटना घडल्याने केज शहरात खळबळ उडाली आहे. या पकडलेल्या एक अपहरणकर्त्याला पोलिसांच्या ताब्यात दिले आहे. पोलिसांनी या प्रकरणी चौकशी केली असता गैरसमजुतीतून हा प्रकार घडला असल्याचे सांगितले.

**गैरसमजातून झालेला प्रकार पोलिसांनी दिली माहिती**

## जाहीर प्रगटन

मा.तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी शिरूर का.यांच्या न्यालयात जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) अन्वये दाखल जन्म/मृत्यू प्रकरणमध्ये नोंद घेणेबाबत.

ज्या अर्थी अर्जदार, मनिषा भ्र.महेंद्र मोरे, रा.घाटशिळ पारगाव ता.शिरूरकासार जि.बीड ांनी त्यांचा मुलगा नामे आर्यन महेंद्र मोरे यांचा जन्म दिनांक ०६/०६/२०२४ रोजी घाटशिळ पारगाव गाव येथे झाल्याची नोंद करणेबाबत या न्यायालयात अर्ज केला आहे.

त्या अर्थी या दिनांकाबाबत आक्षेप असल्यास सदर आक्षेप स्वत: किंवा आपले वकीलामार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसात नोंदवावा अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजून अर्जाची सुनावणी घेऊन नियमाप्रमाणे आदेश केला जाईल.

स्वाक्षरित

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी शिरूरकासार**

# बीड जिल्हयाला बाल विवाह निर्मुलनासाठी प्रतिष्ठित 'स्कॉच' चा पुरस्कार प्रदान

## तत्कालीन जिल्हाधिकारी दिपा मुधोळ मुंडे यांनी स्वीकारला पुरस्कार



**बीड (प्रतिनिधी):-**बीड जिल्हयाने बाल विवाह निर्मुलन कार्यक्रम उत्कृष्टपणे राबविल्याबद्दल स्कॉच या नामंकित संस्थेचा चा स्कॉच २०२४ राष्ट्रीय पुरस्कार बीडच्या तत्कालीन जिल्हाधिकारी दिपा मुधोळ मुंडे यांना आज प्रदान करण्यात आला.

विविध क्षेत्रातील अतुलनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना दरवर्षी हा पुरस्कार संस्था प्रदान करीत असते. श्रीमती दीपा मुधोळ मुंडे बीडच्या जिल्हाधिकारी पदावर असताना त्यांच्या मार्गदर्शनात बीड जिल्हयात बाल विवाह रोखण्यासाठी विविध पाऊले उचलण्यात आली. त्याचा सकारात्मक परिणाम झाला असून या काळात होणारे आणि होत असलेले बाल विवाह थांबविण्यात प्रशासनाला यश आले. याचीच पोच पावती म्हणुन स्कॉच या राष्ट्रीय स्तरावरील संस्थेने या कामाची दखल घेत बीड जिल्हयाची बाल विवाह निर्मुलनासाठी निवड केली गेली होती. राजधानी नवी दिल्ली येथे ९९ व्या स्कॉच परिषदेनिमित्त इंडिया हॅबिटाईट सेंटरच्या सिल्वर ओक सभागृहामध्ये एका शानदार समारंभात त्यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

बालविवाह निर्मूलनासाठी बीड जिल्ह्याने राबविलेल्या अभिनव उपाययोजना : दीपा मुधोळ मुंडे

बीड जिल्ह्यात बाल विवाहाचे प्रमुख कारण म्हणजे उसतोड कामगाराची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. तसेच हुंडा प्रथा, बाल लिंग गुणोत्तर, गरिबी, जुन्या चाली रूढी या समस्या गंभीर स्वरूपाच्या आहेत. त्यामुळे बाल विवाह रोखणे तसेच जन जागृती करणे या बाबत बीड जिल्ह्यात तत्कालीन जिल्ह्याधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी विशेष मोहीम हाती घेतले असल्याचे सांगीतले.

जिल्ह्यात वर्ष २०२१ पासून विवाह निर्मूलन युनिसेफ, एस बी सी ३ चाईल्ड लाईन बोर्ड, बाल कल्याण समिती बीड, सामाजिक कार्यकर्ते व सामाजिक संस्था आणि प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने बाल विवाह प्रतिबंध अधिनियम २००६ राबविण्यासाठी विविध उपाय योजना सुरु केल्या. बाल विवाह निर्मूलन या विषयावर जिल्ह्यातील विविध विभागातील अधिकाऱ्यांसोबत दर महा जिल्हा कृती दल बैठक आखली. याअंतर्गत जिल्ह्यातील प्रत्येक शाळा कॉलेज, प्राथमिक आरोग्य केंद्र, अंगणवाडी, पोलीस स्टेशन व ग्रामपंचायत येथे दर्शनीय भागात चाईल्ड हेल्प लाईन १०९८ चा लोगो पेंट करण्यात आला आहे. जिल्ह्यातील सर्व गावामध्ये ग्राम बाल संरक्षण समित्यांचे नव्याने स्थपना करण्यात आल्या. जिल्ह्यातील सर्व तालुक्यात तालुका बाल संरक्षण समित्या अद्यावत करण्यात आल्या.

### बाल विवाह मुक्त बीड या मोहिमेमुळे बीड जिल्ह्यात झालेले परिणाम

**चाइल्ड हेल्पलाइन १०९८ या क्रमांकाचे ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात जन जागरण झाल्याने एप्रिल २०२४ ते सप्टेंबर २०२४ अखेर १८२ बाल विवाह थांबवून ०३ प्रकरणात बाल विवाह प्रतिबंध कायदा २००६ अन्वये गुन्हे नोंद करण्यात आले आहेत. वर्ष २२-२३मध्ये १३२ , वर्ष २३-२४ मध्ये २५५ बाल विवाह थांबविण्यात प्रशासनाला यश आले आहे अशी प्रतिक्रिया दीपा मुदळ मुंडे यांनी पुरस्कार स्वीकारल्यानंतर व्यक्त केली. बाल विवाह करणे/लावणे व त्यास प्रोत्साहन देणे हा कायद्याने गुन्हा आहे, बाल विवाहाची बोलणी करणे, मुलगी पाहणे, यादी करणे, साखरपुडा करणे, कुंकू टिळा करणे, हळदी कार्यक्रम करणे, हे सुद्धा कायद्याने गुन्हाच आहे.**

जिल्ह्यातील शिक्षक, केंद्र प्रमुख, अंगणवाडी सेविका आशा सेविका, अंगणवाडी पर्यवेक्षिका, व ग्रामसेवक असे एकूण ४७५१ कर्मचा-यांची कार्यशाळा घेतल्या. किशोर वयीन मुलामुलींची बाल विवाह संदर्भात जनजागृतीचे कार्यक्रम आखले.

५१४ केंद्र प्रमुख व बाल रक्षक शिक्षक अंगणवाडी पर्यवेक्षिका व ग्राम सेवक, गट प्रवर्तक पोलीस कर्मचारी शिक्षण विभागाचे कर्मचारी यांची कार्यशाळा घेण्यात आले. जिल्हा महिला व बाल विकास, युनिसेफ, एसबीसी ३ व युवा ग्राम विकास मंडळ केज यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील १२५ माध्यमिक व उच्च माध्यमिक जिल्हा परिषद शाळेतील ७३१३ मुली व ६५६२ मुले असे एकूण १३८७५ यांचे जन जागृतीचे कार्यक्रम घेतले. जिल्ह्यात १२५ माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील किशोर वयीन मुला मुलीच्या पालकांना :पालक संवेदना' कार्यक्रम राबवून १३८७५ पाल्याचे व ५१३० पालकांचे बाल विवाह जन जागृती केली. सक्षम युवा शक्ती कार्यक्रमातर्गत बीड जिल्ह्यातील २१ महाविद्यालयीन विद्यार्थी यांनी रायमोहा (शिरूर कासार) अमळनेर (पाटोदा) व कडा (आष्टी) या ठिकाणी बाल विवाह जन जागृती अनुषंगाने पथनाट्य खेळ व गाण्याचे माध्यमातून ५ हजार पेक्षा अधिक लोकापर्यंत संदेश पोहचविण्यात आला. १५ ऑगस्ट २०२३ रोजी ३८०० मुलांची बीड जिल्ह्यात जन जागृती रली काढण्यात आली. बाल विवाह निर्मुलन विषयक कामकाजात मदत करण्यसाठी जिल्ह्यातील ११ तालुक्यामध्ये ६३ नेमणूक करण्यात आली आहे. जिल्हातील सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये दर सोमवारी बालविवाह निर्मुलन विषयी प्रतिज्ञा घेतली जाते. १५ ऑगस्ट व २ ऑक्टोबर रोजी गावात होणा-या ग्राम सभेत बाल विवाह मुक्त ग्रामपंचायत या बाबत ठराव घेण्यात येत आहेत.

### बाल विवाह लावल्यास गुन्हा कोणावर नोंदविला जातो

नवरा मुलगा, मुलाचे मुलीचे आई-वडील, मुलाचे मुलीचे मामा-मामी, आज्जी आजोबा, विवाह सोहळ्यास उपस्थिती इतर सर्व नातेवाईक, वऱ्हाडी मंडळी, मंगल कार्यालय वाले, मंडपवाले, आचारी, बाजेवले, फोटोग्राफर, भटजी, पाणी वाले, डीजेवाले, घोडेवाला, व लग्न लावण्यास प्रत्यक्ष अप्रत्यक्ष मदत करणारे सर्व व्यक्ती. यांच्यावर गुन्हा दाखल होऊ शकतो, या सर्वांबाबत जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात जनजागृती केल्यामुळेच बालविवाह थांबवण्यास यश आले. ज्यांचे बालविवाह थांबवले त्यांच्या चेहऱ्यावरचे हसू आणि भविष्यातील त्यांना भेडसावणाऱ्या समस्या थांबविण्यात प्रशासनाला अंशतः का होईना यश आले. आजच्या स्कॉच चा मिळालेला पुरस्कार केलेल्या कामांची पोचपावती आहे, याचा विशेष आनंद होत असल्याची प्रतिक्रिया पुरस्कार प्राप्तीनंतर दीपा मुधोळ मुंडे यांनी व्यक्त केली.

## केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांचा सत्कार सोहळा ऐतिहासिक होणार-राजू जोगदंड

**बीड। प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संकल्पनेतील रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची भारत सरकारच्या केंद्रीय मंत्रिमंडळात तिसऱ्यांदा निवड झाल्याबद्दल बीड जिल्हा रिपाइंच्या वतीने शनिवार (दि.५) ऑक्टोबर रोजी सायंकाळी ठीक ५ वाजता बीड शहरातील छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण, छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे भव्य सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

भव्य सत्कार सोहळ्यास राजा सरवदे (रिपाइं प्रदेश अध्यक्ष), अविनाश महातेकर (राष्ट्रीय सरचिटणीस रिपाइं), बाबुराव कदम (राज्य कार्याध्यक्ष रिपाइं), गौतम सोनवणे (राज्य सरचिटणीस रिपाइं), दौलत खरात (रिपाइं नेते),अड. ब्रह्मानंद चव्हाण (रिपाइं नेते), मिलिंद शेळके (मराठवाडा अध्यक्ष रिपाइं), परशुराम वाडेकर (रिपाइं नेते), चंद्रकांत चिकटे (रिपाइं नेते), श्रीकांत भालेराव (रिपाइं नेते), सिद्धार्थ कासारे (मुंबई प्रदेश अध्यक्ष रिपाइं), डॉ. विजय मोरे (राज्य सरचिटणीस रिपाइं युवक आघाडी), डॉ. सिद्धार्थ भालेराव (रिपाइं नेते), सचिन मोहिते (मुंबई प्रदेशाध्यक्ष युवक आघाडी रिपाइं), भास्कर रोडे (राज्य सदस्य रिपाइं), विजय सोनवणे (रिपाइं नेते) आदी प्रमुख मान्यवर उपस्थित राहणार आहेत. मंत्री रामदास आठवले यांचा बीड शहरातील सत्कार सोहळा ऐतिहासिक करण्यासाठी जिल्हाभरातील रिपाइं पदाधिकारी, युवक आघाडी रिपाइं पदाधिकारी, महिला आघाडीच्या पदाधिकारी, गायरान धारक, विद्यार्थी आघाडी, क्रियाशील सदस्य, सर्कल प्रमुख व कार्यकर्ते यांनी हजारोच्या संख्येने उपस्थित राहून भव्य सत्कार सोहळा ऐतिहासिक करावा. असे आवाहन रिपाइंचे बीड जिल्हा सरचिटणीस राजू जोगदंड यांनी केले आहे.

## डिजिटल मीडिया परिषदेच्या प्रदेशाध्यक्षपदी अनिल वाघमारे

**पुणे। प्रतिनिधी**

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद संलग्न असलेल्या डिजिटल मीडिया परिषदेचे महाराष्ट्र राज्याचे पहिले प्रदेशाध्यक्ष म्हणून डोंगरचा राजा चे संपादक अनिल वाघमारे यांची नुकतीच निवड जाहीर करण्यात आली. संपादक अनिल वाघमारे यांच्या निवडीबद्दल सर्वच क्षेत्रातील मान्यवर, स्नेही मित्रांनी अभिनंदन करत त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

याबाबत अधिक वृत्त असे की, पुण्यातील पिंपरी चिंचवड येथे आचार्य अत्रे सभागृहात नुकतीच मराठी पत्रकार परिषद संलग्न असलेल्या डिजिटल मिडिया परिषदेची राज्यस्तरीय कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेच्या कार्यक्रमात गेल्या अनेक वर्षांपासून मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त श्री. एस.एम.देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यभरात परिषदेचे काम करत असलेले तसेच श्री.एस.एम.देशमुख यांचे अत्यंत विश्वासू म्हणून ओळखले जाणारे संपादक अनिल वाघमारे यांची डिजिटल मिडिया परिषदेचे पहिले प्रदेशाध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली. व्यासपीठावर उपस्थित असलेले परिषदेचे मुख्य विश्वस्त श्री.एस.एम.देशमुख यांनी त्यांची प्रदेशाध्यक्ष म्हणून निवड केली जात असल्याचे जाहीर करताच सभागृहात टाळ्यांचा गजर करत उपस्थित हजारो पत्रकार बांधवांनी त्यांचे अभिनंदन केले. संपादक अनिल वाघमारे हे गेली अनेक वर्षे मराठी पत्रकार परिषदेच्या जडणघडणीत मोलाचं काम करत आले आहेत. बीड जिल्ह्यातल्या वडवणी या छोट्याशा तालुक्यात त्यांनी आपल्या पत्रकारीतेचा प्रारंभ केला. व सर्व सामान्य माणसाला न्याय मिळवून देण्यासाठी आपल्या लेखणीतून सतत पाठपुरावा केला. बीड जिल्ह्यातील सर्व राजकीय, सामाजिक,



धार्मिक, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांमध्ये त्यांनी आपली ओळख निर्माण केली आहे. त्यांची एकनिष्ठता,संघटन कौशल्य आणि अनुभव या सर्वांचा विचार करून मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त श्री.एस.एम.देशमुख यांनी त्यांची निवड जाहीर केली आहे. संपादक अनिल वाघमारे यांच्या निवडी बद्दल महाराष्ट्र राज्यातील पत्रकार, स्नेही मित्र व विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या आहेत.

## राष्ट्रीय मजदूर कॉँग्रेस (इंटक) पदाधिकाऱ्यांची कार्यकारिणी जाहीर

### गणेश बजगुडे पाटील व रामधन जमाले यांच्या हस्ते नियुक्ती पत्राचे वितरण

बीड (प्रतिनिधी) राष्ट्रीय मजदूर कॉँग्रेस (इंटक) चे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.जी संजीवा रेड्डी यांच्या व महाराष्ट्र अध्यक्ष डॉ.कैलास भाऊ कदम, महाराष्ट्र उपाध्यक्ष बाबासाहेब चव्हाण यांच्या आदेशावरून बीड जिल्हा शासकीय विश्रामगृह येथे दि. १९ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ११.३० वाजता बैठक घेण्यात आली. या बैठकी मध्ये संघटित व संघटित क्षेत्रातील कामगारांना न्याय मिळावा या उद्देशाने सामाजिक कार्यकर्ते यांची राष्ट्रीय मजदूर कॉँग्रेस इंटक बीड जिल्ह्याच्या पदाधिकाऱ्यांची निवड करुन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.

पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करतांना कॉँग्रेसचे तालुकाध्यक्ष गणेश बजगुडे पाटील (इंटक) संघटने विषयी सविस्तर माहिती देतांना ते म्हणाले, संघटीत, असंघटीत कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी इंटक सदैव तत्पर असते. कामगारांनी आपल्या अडीअडचणी, समस्या सोडवून घेण्यासाठी इंटकमध्ये सहभागी व्हावे असे आवाहन करुन इंटक संघटनेच्या पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

संघटित व असंघटित क्षेत्रातील कामगारांना न्याय हक्क मिळवून देण्यासाठी त्यांना महाराष्ट्र मजदूर कांग्रेस (इंटक) बीड जिल्ह्याच्या कार्यकारिणीची निवड करण्यात आली. यावेळी



बीड जिल्हा कॉँग्रेस कमिटीच्या वतीने कॉँग्रेस तालुकाध्यक्ष गणेश दादा बजगुडे पाटील व त्यांचे सहकारी अनेक मान्यवरच्या उपस्थितीमध्ये बीड जिल्हा राष्ट्रीय मजदूर कॉँग्रेस इंटक बीड जिल्हा पदाधिकारी यांना निवडीचे पत्र देण्यात आले.

बीड जिल्हा कॉँग्रेस (इंटक) कार्यकारिणी पुढील प्रमाणे - उपजिल्हाध्यक्ष -संदीप भाऊसाहेब झिंजुर्के , सचिव- सखाराम काशिनाथ बेगंडे, सहसचिव -मधुसूदन मोहन मस्के, कोषाध्यक्ष - अशोक सखाराम धुमक, संघटक- वैजनाथ किसन बर्डे, सदस्य- महादेव गणपत कुरवडे, सदस्य- दयानंद काशिनाथ धुरंदरे, सदस्य- मारुती सूर्यभान आगाव, सदस्य- किशोर ज्ञानोबा यादव इत्यादी पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.

## राज्यस्तरीय स्पर्धेत शिवाजी घोडके यांनी पटकावले सुवर्णपदक

*बीड (प्रतिनिधी):-* योग फेडरेशनच्या राज्यस्तरीय स्पर्धेत बीड जिल्ह्यातील योगमटूंनी उत्कृष्ट कामगिरी करुन सुवर्ण, रौप्य व कांस्यपदके पटकावली. योग फेडरेशन ऑफ इंडिया आणि महाराष्ट्र योगासन स्पोर्ट्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय योगासन स्पर्धा १४ व १५ सप्टेंबर २०२४ रोजी पुणे येथे पार पडल्या. यात बीडच्या शिवाजी घोडके यांनी बीड जिल्ह्याला सुवर्णपदक प्राप्त करुन दिले. या शिवाय मूळचे बीडच्या पालवणचे अमोल मस्के व सौताडा येथील योगेश सानप यांनी पुणे संघाचे प्रतिनिधित्व केले. मस्के यांनी सलग तीन वर्षांपासून सुवर्णपदक पटकावत सुवर्णपदकाची हॅट्रिक केली. सानप (सौताडा) यांनीही रौप्यपदक पटकावले. या सोबतच विकास गवते, नानाभाऊ काटे व श्रेया प्रशांत घिके यांनीही कांस्यपदकाची कमाई केली.

या सर्वांची ४९ व्या राष्ट्रीय योगासन स्पर्धेसाठी निवड झाली आहे. नियमित सरावाच्या जोरावर योगासन स्पर्धेमध्ये चांगली कामगिरी या बीड जिल्ह्यातील योगपटूंनी केली आहे. इंडियन योगा टीमचे कोच व मार्गदर्शक चंद्रकांत पांगारे, पुणे जिल्हा योगासन स्पोर्ट्स फेडरेशनच्या सचिव अनिता गायकवाड व तांत्रिक संचालक विद्या महाले यांचे स्पर्धकांना मार्गदर्शन लाभले.



## नैतिकता ही सांगण्याची नाहीतर आचरणात आणण्याची बाब-डॉ. पाटंगणकर

### सुंदरराव सोळंके व्याख्यानमालेचे तिसरे पुष्प

**माजलगाव (प्रतिनिधी):-** नैतिकतेचे अध:पतन होत आहे. मनावर नियंत्रण नैतिकता ठेवते. बाहेरच्यापेक्षा अंतरंग महत्वाचे आहे. गैरवर्तणुकी बद्दल भीती असावी. नैतिकतेची शिकवण घरातून द्यावी. नैतिकता ही सांगण्याची नाहीतर आचरणात आणण्याची बाब आहे असे प्रतिपादन डॉ. विद्यासागर पाटंगणकर यांनी सुंदरराव सोळंके व्याख्यानमालेत तिसरे पुष्पगुंफताना व्यक्त केले. सुंदरराव सोळंके यांच्या जयंती निमित्ताने सुंदरराव सोळंके महाविद्यालयात तीन दिवसीय व्याख्यानमालेचे तिसरे पुष्प प्रसिद्ध साहित्यिक डॉ. विद्यासागर पाटंगणकर यांनी गुंफले. कार्यक्रमाचे अध्यक्ष सत्यप्रकाश रुद्रवार होते. यावेळी प्राचार्य डॉ. जी. के. सानप, प्रा. स्नेहल पाठक, सौ. रेणुका




पाटंगणकर, उपप्राचार्य डॉ. एम. ए. कव्हळे, मराठी विभागप्रमुख डॉ.भाऊसाहेब राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी वर्तमान समाज व्यवस्था व नैतिकता या विषयावर बोलताना डॉ.पाटंगणकर म्हणाले की, शैक्षणिक क्षेत्रात आर्थिक, शारीरिक, मानसिक शोषण होत आहे तसेच रामाच्या नावाचा जप करून भोंदू बाबा लोकांना भुलवतात. काही आश्रम हे शोषणाचे केंद्र होत आहेत. अशामुळे नैतिकतेची अध:पतन होत आहे. यावर बुद्धिवंतांनी नीतिमत्तेचा अंकुश ठेवावा असे सांगितले. यावेळी प्राचार्य डॉ. जी. के. सानप यांनी विद्यार्थ्यांना नीतिमत्ता विषयी समयोचित मार्गदर्शन केले. ङ्ग कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. एम. ए. कव्हळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. ज्ञानेश्वर कुंडकर यांनी केले तर आभार प्रा. अशोक दौंडे यांनी मानले. या कार्यक्रमाला विद्यार्थी- विद्यार्थिनी, पालक, प्राध्यापक,कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

## बीडच्या भूमिपुत्राला मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीवर काम करण्यास संधी

### मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कायदेशीर सल्लागारपदी ॲड. युवराज बहिरवाळ

**मुंबई (प्रतिनिधी):-** बीड जिल्ह्याचे भूमिपूत्र तथा पिंपळवाडी गावचे रहिवाशी ॲड.युवराज किसनराव बहिरवाळ या होतकरु तरुणास मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये काम करण्याची संधी मिळाली आहे. मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोकराव डक यांनी विशेष परिश्रम घेवून बीडच्या भूमिपुत्राला न्याय देवून ॲड.युवराज बहिरवाळ यांना मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कायदेशीर सल्लागारपदी निवड करुन बीड जिल्ह्याचा व मराठवाड्याचा लौकिक वाढविला आहे.

ॲड. युवराज बहिरवाळ हे सुरुवातीच्या काळात सामाजिक कार्यात अग्रेसर राहून राजकारणात देखील त्यांनी आपली कार्याची छाप पाडली आहे. पंचायत समिती निवडणूक, बिनविरोध सरपंच, सरपंच संघटनेच्या बीड तालुकाध्यक्ष, सर्व शिक्षा अभियानचे बीड जिल्हा सदस्य, पाणलोट समिती अध्यक्ष, बीड कारागृह अकार्यकारी समिती सदस्य अध्यक्ष अशा विविध पदावर त्यांनी उत्कृष्ट कार्य केले आहे. तसेच ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी मोफत वसतीगृह चालवून अनेक वर्षे त्यांनी हे वसतीगृह विनामुल्य चालविले. तसेच समाजातील विविध सामाजिक कार्यात त्यांचा नेहमी खारीचा वाटा असतो.

युवराज बहिरवाळ हे कृषी पदवीधर असल्यामुळे व ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या अडीअडचणींची जाण असल्याने तसेच कायदे विषयक ज्ञान असल्याने त्यांच्या या सर्व गोष्टींची दखल घेवून मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोकराव डक व सर्व संचालक मंडळाने एकमुखाने त्यांची कायदेशीर सल्लागारपदी निवड केली आहे. ॲड.युवराज बहिरवाळ यांची मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कायदेशीर सल्लागारपदी निवड झाल्याबद्दल त्यांच्यावर मराठवाड्यासह संपूर्ण बीड जिल्हाभरातून त्यांचे अभिनंदन व शुभेच्छा देण्यात येत आहे.



### शेतकऱ्यांच्या अडीअडचणी, कायदेशीर बाजु प्रभावीपणे मांडणार - ॲड.युवराज बहिवाळ

मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोकराव डक यांनी माझ्यावर सोपविलेली जबाबदारी आपण प्रामाणिकपणे पार पाडणार असून शेतकऱ्यांच्या विविध समस्या, त्यांच्या अडीअडचणी तसेच मुंबई बाजार समितीची कायदेशीर बाजु आपण प्रभावीपणे मांडणार आहोत. तसेच निवडीबद्दल अशोक (आबा) डक यांनी बीड जिल्ह्याला माझ्या रुपाने संधी देवून जिल्ह्याचा लौकिक वाढविला असून त्याबद्दल अशाोक आबा डक, सचिव व सर्व संचालक मंडळाचे आभार ॲड.युवराज बहिरवाळ यांनी मानले आहे.

